# मतं देणारी गुंतवणूक- मोहल्ला कमिटी

**६ मार्च २०१२**

तन्मय कानिटकर

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# मतं देणारी गुंतवणूक- मोहल्ला कमिटी

## मोहल्ला कमिटी कशासाठी?

नागरिकांचा प्रशासनात सहभाग आणि त्यातून परिवर्तन यासाठी मोहल्ला कमिटी असतात. ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार अधिकाधिक अधिकार हळूहळू स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्रदान करणे अपेक्षित आहे. मनसेच्या दृष्टीने मोहल्ला कमिटी आणि त्यात नगरसेवकाने काम करणे ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे.

## पुण्यातील मोहल्ला कमिटी

स्थानिक प्रशासनात नागरिकांचा सहभाग वाढावा, सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे या उद्देशाने ७४वी घटना दुरुस्ती[1] करण्यात आली. स्थानिक निर्णय प्रक्रियेत नागरिकांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने आणि ७४ व्या घटना दुरुस्तीच्या उद्देश लक्षात घेता पुण्यातील मोहल्ला कमिटी हे मोठेच व्यासपीठ नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांच्यासाठी उपलब्ध आहे.

मोहल्ला कमिटी बैठक ही दर महिन्यातून एकदा क्षेत्रीय कार्यालयात भरते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या बैठकीचा दिवस वेगळा असतो. काही क्षेत्रीय कार्यालयात महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी ही बैठक घेतली जाते तर काही ठिकाणी महिन्यातल्या तिसऱ्या बुधवारी घेतली जाते.

ही बैठक सर्व नागरिकांसाठी खुली असते. यामध्ये नागरिकांनी येऊन आपल्या प्रभागाबद्दल तक्रारी व सूचना देणे अपेक्षित असते. या बैठकीला क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालयातील विविध

---

[1] Since it was observed that the Urban Local Bodies (ULBs) were "*not able to perform effectively as vibrant democratic units of self-government*", one of the reasons for this being the "*inadequate devolution of powers and functions*", the Indian legislature passed the 74th Constitutional Amendment Act in 1992 - quoted from Statement of Objects and Reasons, Constitution (74th Amendment) Act, 1992.

[1] Article 243W. Subject to the provisions of this Constitution, the Legislature of a State may, by law, endow—

(a) the Municipalities with such powers and authority as may be necessary to enable them to function as institutions of self-government and such law may contain provisions for the devolution of powers and responsibilities upon Municipalities...

विभाग प्रमुख, अधिकारी हे उपस्थित असतात. यावेळी नागरिकांनी केलेल्या तक्रारी, सूचना याची दखल या अधिकाऱ्यांना घ्यावी लागते. दर महिन्याच्या बैठकीत आधीच्या महिन्यात केलेल्या सूचना तक्रारींवर क्षेत्रीय कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा अहवाल उपस्थित नागरिकांना दिला जातो. अशा पद्धतीने नागरिक आणि प्रत्यक्ष काम करणारे क्षेत्रीय कार्यालय पातळीवरचे अधिकारी यांच्यात संवाद होतो.

## निवडणुकीत फायदाच फायदा!

मोहल्ला कमिटीच्या मिटींग्जना नगरसेवक उपस्थित राहिल्यास नागरिकांच्या मनात पक्षाची आणि नगरसेवकाची वैयक्तिकसुद्धा विश्वासार्हता प्रचंड वाढेल. नागरिकांना सहभागी करून घेत खऱ्या अर्थाने महापालिका प्रशासनावर वचक ठेवता येऊ शकेल! नागरिकांनी मांडलेले प्रश्न नगरसेवकालाही माहित आहेत हे पाहून क्षेत्रीय अधिकाऱ्यांवरही वचक राहील. या बैठकांना एक नियमितता आणि गांभीर्य येईल. नागरिक-नगरसेवक-अधिकारी या साखळीतले तीनही घटक एकाच वेळी एकाच ठिकाणी उपस्थित असणे केव्हाही श्रेयस्कर!

गेल्या काही वर्षात, नागरिकांना प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याची मागणी जोर धरत आहे. विविध संस्था संघटना यासाठी झगडत आहेत. शिवाय गेल्याच वर्षी झालेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनांचा अजूनही लोकांच्या मनावर परिणाम आहे. अशा परिस्थितीत पुण्यातील बहुसंख्येने असलेल्या सुशिक्षित मध्यमवर्गीय लोकांना पक्षाकडे आणि विद्यमान नगरसेवकाकडे खेचण्याचा मोहल्ला कमिटी हा ‘राज’मार्ग आहे. २०१४ च्या विधानसभा आणि त्यानंतर येणाऱ्या २०१७ च्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवता पक्ष सातत्याने नागरिकांसाठी काम करतो आहे हे दिसणे आवश्यक आहे. ‘मनसे स्टाईल’ आंदोलनांमुळे जो मतदार वर्ग आपल्या पक्षापासून दूर असतो तेही मोहल्ला कमिटीमध्ये आपल्या पक्षाच्या नगरसेवकांच्या सहभागामुळे मनसेचे मतदार होतील.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, मोहल्ला कमिटीमध्ये नगरसेवकांनी जाणे ही पुढच्या सर्व निवडणुकीच्या दृष्टीने “गुंतवणूक” (Investment) आहे.

## मतदान न करणाऱ्यांना मनसेचे मतदार बनवता येईल

सध्या जेमतेम ५०-५५% मतदान होते. प्रमुख ५ पक्ष, त्यांच्यातल्या अंतर्गत बंडखोरी आणि वाद, शिवाय पुणे नागरिक संघटना, पुणे जनहित आघाडी, भ्रष्टाचारविरोधी डावी आघाडी या सगळ्यांमध्ये सध्याचे मतदार विभागले गेले आहेत. साहजिकच स्पर्धा प्रचंड आहे. नागरी सहभागासाठी असलेल्या पुणे नागरिक संघटना आणि तत्सम छोटे गट यांचे अस्तित्वच गरजेचे नाही असे काम आपण करून दाखवू शकतो. यातून या मतदान न करणाऱ्या ५०% मतदारांना आपण मनसेचे मतदार म्हणून बांधू शकू.

## एका दगडात दोन-तीन पक्षी!

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महापालिका निवडणुकीत निवडून येणारे नगरसेवक दर सहा महिन्याला वॉर्ड सभा घेण्याचे जाहीरनाम्यात आश्वासन दिले आहे. प्रत्यक्षात ते किती वॉर्ड सभा घेतील याबद्दल शंकाच आहे. मोहल्ला कमिटी म्हणजे एक प्रकारची वॉर्ड सभाच असते. त्यामुळे मोहल्ला कमिटीमध्ये मनसेचे नगरसेवक उपस्थित राहिले तर मनसे दर महिन्याला वॉर्ड सभा घेते असा त्याचा अर्थ होतो. मोहल्ला कामिटीतल्या मनसेच्या सहभागामुळे आपण राष्ट्रवादी, "पार्टी विथ डीफरन्स" म्हणवून घेणाऱ्या भाजप, मतं खाऊ शकणाऱ्या नागरी संघटना आणि अपक्ष या सगळ्यांना काही प्रमाणात शह देऊ शकू. विशेषतः सुशिक्षित मतदार असलेल्या प्रभागांमध्ये!

## मोहल्ला कमिटी ही जबाबदारी मनसे कार्यकर्त्यांचीही

नगरसेवकांबरोबरच नं.२ ची मते पडलेले उमेदवार, कार्यकर्ते या सगळ्यांनी मोहल्ला कमिटीमध्ये उपस्थित राहून नागरिकांचे प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. कारण जिथे पक्षाचे नगरसेवक आहेत तिथेच केवळ काम करून उपयोग नाही. पक्षाची ताकद वाढवण्यासाठी आणि २०१४ च्या पुण्यातल्या ८ विधानसभा जागा जिंकण्यासाठी सगळ्याच प्रभागात काम करावे लागेल.

## मनसेसाठी मोहल्ला कमिटी हा 'राज'मार्ग -

पक्षाच्या वचकनाम्यातील,

1. *आपल्या शहरात कोणत्या चुकीच्या आणि अनधिकृत गोष्टी चालल्या आहेत त्या महानगरपालिकेपर्यंत तुम्ही पोचवू शकाल असा सुसज्य व प्रभावी कक्ष उभा करू.*
2. *दर महिन्याला कोणत्या गोष्टी, कुठे, आणि कशासाठी मंजूर झाल्या याची माहिती तुमच्यापर्यंत पोचवू.*
3. *दर सहा महिन्याचा खर्चाचा तपशील तुमच्या समोर ठेवू.*
4. *विकासकामांच्या नियोजनात तुमचा सहभाग घेऊ.*

या सर्व गोष्टी करण्यासाठी मोहल्ला कमिटी हे मोठेच व्यासपीठ नगरसेवकासाठी उपलब्ध आहे. अस्तित्वात असलेलेच हे व्यासपीठ वापरले तर वेगळा पैसा आणि श्रम या दोन्हीची बचत होईल. म्हणूनच मोहल्ला कमिटीचा वापर करून वचकपूर्ती करणे हाच अधिक सोयीचा आणि प्रभावी मार्ग आहे

त्या दृष्टीने 'दर महिन्याच्या अमुक अमुक दिवशी असणाऱ्या मोहल्ला कमिटीच्या मिटींग्ज मध्ये मी उपस्थित असतो/असते, नागरिकांनी आपल्या तक्रारी घेऊन तिथे यावे' असं आपल्या प्रभागात सांगितल्यास नगरसेवकावर पडणाऱ्या कामाचा बोजा काही प्रमाणात कमी होणार, पण दुसऱ्या बाजूला लोकप्रियताही वाढणार!

---

# -मोहल्ला कमिटीची माहिती-

## मोहल्ला कमिटीचा इतिहास

भिवंडी मध्ये झालेल्या हिंदू मुस्लीम दंगलीनंतर तत्कालीन आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे[2] यांनी मोहल्ला कमिटी ही संकल्पना मांडली, आणि राबवली देखील. याची संकल्पना विचारात घेता काही ठिकाणी या कमिट्यांचे नाव "शांतता/ दक्षता कमिटी" असेही आहे.

मोहल्ला कमिटीच्या मिटींगमध्ये पोलीस आणि नागरिक यांच्यात थेट संवाद अपेक्षित असतो. आणि ठराविक कालावधीने या मिटींग्ज होणे अपेक्षित असते. यामध्ये नागरिक,

[2] http://sureshkhopade.com/bhiwandipart-07.html

नागरिकांचे प्रतिनिधी यांनी पोलीस अधिकाऱ्यांसमोर तक्रारी कराव्यात, अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करावे, आवश्यक ती कार्यवाही करावी आणि पुढच्या मिटींगमध्ये काय कार्यवाही केली याबद्दल नागरिकांना सविस्तर माहिती द्यावी. नागरिकांच्या सहभागाने पोलिसांची कार्यक्षमता वाढवणे हा मोहल्ला कमिटी मागचा प्रमुख उद्देश होता. अनेक ठिकाणी हे बऱ्याच अंशी साध्यही झाले. आता भारतातील इतरही राज्यात मोहल्ला कमिटी सारखे प्रयोग करण्यात आले आहेत.[3] पंजाब, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ, मध्य प्रदेश अशा राज्यांमध्ये पोलिसांबरोबर काम करणाऱ्या मोहल्ला कमिट्या आहेत आणि अनेक ठिकाणी त्या प्रभावीपणे कार्यरत आहेत. सुरेश खोपडे यांनी कमिशनर म्हणून मुंबई रेल्वे पोलीस येथेही मोहल्ला कमिटीची संकल्पना राबवण्याचा प्रयत्न केला.[4]

## मोहल्ला कमिटीबाबत शासकीय परिपत्रके

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मोहल्ला/शांतता कमिट्या बनवाव्यात असे राज्य सरकारने ठरवले आणि परिपत्रके काढली. एक परिपत्रक दिन ८ डिसेंबर १९९९[5] आणि दुसरे १ मार्च २००४[6] रोजी काढण्यात आले.

## इतर नागरी सुविधांबाबत मोहल्ला कमिट्या

नागरिकांच्या सहभागाने प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे आणि प्रशासन अधिक सुकर करणे हा मोहल्ला कमिट्यांचा मूळ हेतू. नागरिकांनी आपण होऊन पर्यावरण, वाहतूक अशा विषयांना धरून शहरी भागात मोहल्ला कमिट्यांची सुरुवात केली. पुणे महापालिकेच्या कामात नागरिकांचा सहभाग वाढवा यासाठी पुण्यात अनेक भागात मोहल्ला कमिट्या बनवण्यात आल्या. पुण्यात सुमारे ३५ मोहल्ला कमिट्या[7] अस्तित्वात असून त्यातील बहुतांश कमिट्या नियमितपणे

---

[3] http://www.humanrightsinitiative.org/new/community_policing_experiments_in_india.pdf

[4] http://articles.timesofindia.indiatimes.com/2004-11-19/mumbai/27163609_1_railway-stations-mohalla-rpf

[5] http://www.irrigation.maharashtra.gov.in/english/gr/index.php?page=715

[6] http://www.pa.maharashtra.gov.in/english/gr/index.php?page=630

[7] http://www.jagrancityplus.com/city-news/mohalla-committees-recognised_1313218043.html

कार्यरत आहेत. महानगरपालिका अधिकाऱ्यांबरोबर नियमितपणे बैठका घेऊन नागरी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न या कमिट्या करतात. पुणे महानगरपालिकेने यातील पाच मोहल्ला कमिट्यांच्याना त्यांच्या कामाबद्दल नुकतेच सन्मानितही केले.